## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे मार्च २०११

## अंधेरी पोलीस ठाणे गु.र.क्र. १२०/११ कलम ४५२,३९७,३४२ भा.दं.वि.

१) गु.र.क्र व कलम — १२०/११ कलम ४५२, ३९७, ३४२ भा.दं.वि.

२) गु.घ.दि व वेळ — दिनांक १७.०३.११ रोजी

३) गु.दा.दि. व वेळ — दिनांक १७.०३.११ रोजी १६.४५ वा

४) गुन्हा उघडकीस — दिनांक १८.०३.११

५) फिर्यादी — रामकृष्णन स्वामीनाथन वय ७१ वर्षे

६) बळीत — फिर्यादी व त्याची पत्नी

७) आरोपी अटक — रामसंजीवन रामप्रसाद निर्मल उर्फ संजीव चौधरी वय ३५ वर्षे

**गुन्हयाची थोडक्यात हकिगत** — गुन्हयाचे तपासामध्ये पोलीस पथक आरोपी काम करीत असलेल्या रोहित पॉवर लॉन्ड्री, अंधेरी पुर्व मुंबई. येथे गेले असता आरोपीच्या पत्याबाबत काही माहिती मिळाली. प्रस्तृत गुन्हयाची हकीगत अशी आहे की, फिर्यादी व त्याची पत्नी दोघेही वयोवृध्द असून आरोपी हा फिर्यादी यांच्या घरामध्ये लॉन्ड्रीचे कपडे घेण्यासाठी येत असे दिंनाक १७.०३.११ रोजी सकाळी ११.१५ वा कपडे घेण्याच्या बहाण्याने आरोपी फिर्यादीचे घरी आला व त्याच्या वृध्दपणाचा फायदा घेवून फिर्यादी व त्याची पत्नी हिस जवळील धारदार सुरा व रिव्हॉल्वर काढून त्याना जीवे मारण्याची धमकी देवून फिर्यादी याचे हातास जखम केली फिर्यादीचे वृध्द पत्नीचे हातातील दोन बांगडया व गळयातील दोन सोन्याची मंगळसुत्र एकुण वजन ९१ ग्रॅम किंमत रुपये १,८०,०००/— जबरदस्तीने काढुन घेतले व फिर्यादी व त्याचे वृध्द पत्नीस बाथरुममध्ये कोंडून ठेवले. सदरबाबत अंधेरी पोलीस ठाणे गु.र.क्र. १२०/११ कलम ४५२, ३९७, ३४२ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तपास चालू असतांना आरोपी हा तेथे लॉड्रीचे काम करत असलेल्या राकेशकुमार विमल याचेजवळ १० दिवसापासून काम करत असल्याचे निष्पन्न झाले तेव्हा विमल याचेजवळ चौकशी केली असता, त्याने तो दहा दिवासापासून काम करत असल्याचे सांगितले म्हणून आरोपीत इसमाचे सामानाची झडती घेतली असता त्यात पॅन्ट व शर्ट मिळून आले. त्याचे शर्टाच्या कॉलरवर ‘‘विकी टेलर, कांदेवाडी, मुंबई — ४ व मोबाईल नंबर’’ मिळून आला. त्यानूसार वि.प.मार्ग पोलीस ठाणे हददीत पोलीस पथकाने नमूद टेलरचा शोध घेतला टेलरने सदरचा शर्ट त्याचे दुकानात शिवला असल्याचे सांगुन सदरचा इसम हा जवळच कोठेतरी इस्त्रीचे काम करीत असल्याची माहिती दिली पोलीस पथकाने आजुबाजुस आरोपीस

ओळखणाऱ्या साक्षिदाराचे मदतीने इस्त्री करण्याऱ्या जागेचा शोध घेत असताना एका दोन चाळीच्या मोकळया जागेतील बाकडयावर **आरोपी रामसंजीवन रामप्रसाद निर्मल उर्फ संजीव चौधरी वय ३५ वर्षे** दिसून आला त्यास साक्षिदाराने ओळखले पोलीस पथकाने विलंब न लावता घेरावा करुन ताब्यात घेतले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता **गुन्हयातील ४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र, २८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र व २३ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या बांगडया एकुण ९१ ग्रॅम वजन कि.रु. १,८०,०००/— ची मालमत्ता हस्तगत करण्यात आली**.

**एकंदरीत सदरचा गुन्हा फक्त टेलरमार्क वरुन नमुद पथकाने तपास करुन सदर गुन्हयातील आरोपीचा मोठया कौशल्याने, चिकाटीने शोध घेवुन, गुन्हा आठ तासाच्या आत उघडकीस आणला आहे.**

अंधेरी पोलीस ठाणे, मुंबईच्या नमुद पथकाने पोलीस कर्तव्यातील गुन्हे तपासाचा व्यवसायीक कस लावून सदरच्या अतिशय कठिण व किचकट गुन्हयाची उकल केल्याने **मा. पोलीस आयुक्त यांनी त्यांना मार्च — २०११ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ठ गुन्हेशोधाचे पारितोषिक जाहिर केले आहे.

<u>तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांची नावे......</u>

१) स.पो.आ. वाडकर /अंधेरी विभाग

२) व.पो.नि. शिवाजीराव देशमुख / अंधेरी पोलीस ठाणे.

३) स.फौ.२०७९६/पखाळे / अंधेरी पोलीस ठाणे.

४) पो.ना.क्र २४४१७/जाधव / अंधेरी पोलीस ठाणे.

५) पो.शि.क्र ३२८४१/पेडणेकर / अंधेरी पोलीस ठाणे.